# <u>प्रेसनोट</u>

**आदेश.क्र.पोउआ/वाहतुक/१०१ /२०१७** **पुणे शहर दिनांक ११ /१२/२०१७**

पुणे शहरामध्ये विशेषतः लक्ष्मी रोड, कुमठेकर रोड, टिळक रोड इ. व्यापारी व गर्दीच्या ठिकाणी येणा-या नागरिकांना वाहने पार्क करण्यासाठी पार्किगची व्यवस्था उपलब्ध नाही. पर्यायाने नागरिक रस्त्याच्या कडेला वाहने पार्क करत असतात. त्यामुळे अरुंद असलेला रस्ता अधिकचा अरुंद होवुन वाहतुक संथ गतिने चालते किंवा वाहतुक कोंडी होते. वाहतुक पोलीसांमार्फत वाहतुक कोंडी होवु नये व वाहतुक सुरळित चालावी यासाठी विविध उपाययोजना करण्यात येतात. सदर भागात पार्किगची सोय उपलब्ध व्हावी म्हणुन वाहतुक पोलीसांकडुन सदर भागातील शाळा कॉलेजच्या मोकळया जागेत पार्किगसाठी जागा उपलब्ध करुन देण्याची शाळा कॉलेज मालकांना विनंती करण्यात आली होती. सदर विनंतीचा विचार करुन स.प.महाविदयालय, नु.म.वि.मुलींची प्रशाला, नु.म.वि.मराठी शाळा व सरस्वती मंदिर बाजीराव रोड या शाळा कॉलेज प्रमुखांनी वाहने पार्क करण्यासाठी त्यांच्या शाळा कॉलेजमध्ये प्रायोगिक तत्वावर व सायंकाळी ०६.०० वो चे नंतर गर्दीचे वेळी जागा उपलब्ध करुन देण्याचे मान्य केले आहे.

तरी या भागात येणा-या वाहन चालक यांनी आपली वाहने रस्त्यावर न लावता वरील नमुद शाळा कॉलेज मध्ये पार्क करुन वाहतुक कोंडी टाळणेसाठी वाहतुक पोलीसांना सहकार्य करावे .

# प्रेसनोट

आदेश.क्र.पोउआ/वाहतुक/१०० /२०१७ पुणे शहर दिनांक ११ /१२/२०१७

पुणे शहरामध्ये नेहमी विविध विकास कामे होत असतात. रस्त्यावर होणा-या विकास कामांना वाहतुक शाखे तर्फे ना हरकतपत्र देण्यात येत असते. विकास कामामुळे रस्त्यातील वाहतुक बंद होत असते किंवा वाहतुक संथ गतिने चालत असते. सध्या पुणे शहरामध्ये खालील नमुद रस्त्यावरील एकुण २९ कामांना ना हरकतपत्र देण्यात आलेले आहे. त्यामुळे सदर भागामध्ये वाहतुक ही दुसरी कडे वळविण्यात आलेली असते किंवा अरुंद रस्त्याने होत असते. पर्यायाने नेहमीच्या वेगात वाहतुक न होता ती संथ गतिने होत असते.

तरी खालील विकास कामाच्या ठिकाणी रस्त्यावरील वाहतुक ही विकास कामामुळे संथ गतिने चालु असल्याने वाहन चालकांनी पर्यायी रस्त्याचा वापर करुन वाहतुक पोलीसांना सहकार्य करावे.

**पुणे महानगर पालिकाकडील चालु असलेली कामे**

१. महाराष्ट्र मेट्रो रेल कार्पोरेशन लिमिटेड मार्फत वनाझ ते रामवाडी मेट्रो चे एकुण १४.६६५ कि.मी. चे काम करण्यात येत असुन त्यातील पहिला टप्पा वनाझ ते आयडियल कॉलनी चे एकुण १.६ कि.मी चे काम चालु आहे. त्यामुळे कोथरुड मधील पौड रोड कडील भागात वाहतुकीवर परिणाम होत आहे.

२. जंगली महाराज रस्त्याचे पुर्नविकास व देखभाल दुरुस्ती काम चालु असल्याने जंगली महाराज व एफ सी रोडवरील वाहतुक बाधित होत आहे.

३. स्मार्ट सिटी पायलट प्रोजेक्ट अंतर्गत, ब्रेमेन चौक ते आंबेडकर चौक औंध या ठिकाणी रस्ते, फुटपाथ, चौक व जंक्शन यांची पुर्नःबांधणी व विकसन काम चालु असल्याने औंध भागातील वाहतुक बाधित होत आहे.

४. प्रभाग क्र. १५ अ मध्ये कुमठेकर रस्ता व प्रभागात इतरत्र मोठया व्यसाची ड्रेनेज लाईन टाकण्याचे काम चालु असल्याने पुणे शहरातील मध्यवर्ती भागातील वाहतुक बाधित होत आहे.

५. प्रभाग क्र.९ येथील रसरंग चौक ते झीरो बॉईज चौका पर्यंत सिमेंट कॉंक्रीट रस्ते तयार करणे.

६. पुणे सातारा रस्त्यावरील स्वारगेट चौक ते कात्रज चौक बी.आर.टी.मध्ये सुधारण व फुटपाथ व सायकल ट्रॅक चे काम करणे.

७. मारुती मंदिर ते नॅशनल हायवे पर्यत, फुरुसंगी, हडपसर ओपन ट्रेंच पध्दतीने महाराष्ट्र नॅचरल गॅस कंपणीची स्टील गॅस पाईन लाईन टाकण्याचे काम करणे.

८. राजाराम ब्रिज ते कॅनॉल रोड ते फन टाईम (सिंहगड रोड) ते गोल्डमाईंड इंटरनॅशनल स्कुल ते बिस्लेरी ऑफीस (कात्रज रोड) पर्यंत स्टिल एम.एन.जी.एल.गॅस पाईप लाईन टाकण्याचे काम करणे.

९. प्रभाग क्र.३९ ब, ताराचंद हॉस्पिटल रास्ता पेठ परिसरात विविध विकास कामे करणे.

१०. २२० केव्ही मगरपटटा उपकेंद्र ते १३२ रास्तापेठ उपकेंद्र दरम्यान १३२ केव्ही भुमिगत केबल टाकणे.

११. शेल पेट्रोल पंप,मुंढवा ते मुंढवा सी. एन. जी. स्टेशन पर्यंत एम.एन.जी.एल.गॅस पाईप लाईन टाकण्याचे काम करणे.

१२. मिर्झा गालिब रोड डोके तालिम ते महात्मा फुले रोड, अक्कलकोट स्वामी समर्थमठ,भवानी पेठ यांना जोडणारा बाळासाहेब साळुंके पथ या रस्त्यावर ड्रेनेज लाईन टाकुन कॉंक्रिटीकरण करणे.

१३. पुना हॉस्पीटल रोड गांजवे चौक ते पत्रकार भवन ते दत्तमंदिर पर्यंत ड्रेनेज लाईनचे काम करणे.

१४. देशमुख पेट्रोल पंप (सातारा रोड) उत्सव हॉटेल चौक ते पी.एम.सी.व्हेईकल डेपो, मुकुंदनगर पर्यत एम.एन.जी.एल.गॅस पाईप लाईन टाकण्याचे काम करणे.

१५. जगताप मंगल कार्यालय ते आळंदी एस.टी.स्टॅण्ड पर्यत पाईप लाईन टाकण्याचे काम करणे.

१६. मलीकनगर ते शिवशक्तीनगर, कोंढवा पर्यंत व शितल पेट्रोल पंप ते मलीकनगर पर्यंत पावसाळी पाण्याच्या लाईन टाकणे.

१७. चिंचेची तालीम ते फडगेट पोलीस चौकी, शुक्रवार पेठ पर्यंत ड्रेनेज लाईन टाकणे.

१८. पर्वती जलकेंद्र ते लष्कर जलकेंद्र पर्यंत २२०० मि.मी. व्यासाची पोलादी जलवाहिनी टाकणे

१९. चंदननगर मुंढवा रस्ता येथे मदर तेरेसा स्कुल ते नगररोड येथे ड्रेनेज लाईन टाकणे.

२०. सिमला ऑफीस चौक ते राजीव गांधी पुल औंध गणेश खिंड रस्ता, पाटील इस्टेट जंक्शन ते संगमवाडी व पाटील इस्टेट जंक्शन ते हॅरिष ब्रीज पुणे मुंबई रस्ता पर्यत येथे रस्ता रुंदीकरण करणे, बीआरटी मार्ग विकसित करणे.

२१. कर्वेनगर वारजे रोड कमिन्स कॉलेज चौक व युनिव्हर्सल चौक येथील उड्डाणपुलाचे काम करणे

२२. हाऊस ऑफ जगताप चौक ते मित्र मंडळ चौक ते पंचशील चौका पर्यंत मैलापाणी शुध्दीकरण करणे.

२३. राष्ट्रीय महामार्ग क्र. ४ बायपास रोडवरील माई मंगेशकर हॉस्पिटल समोर, वारजे,पुणे येथील उड्डाणपुलाचे काम करणे.

२४. राष्ट्रीय महामार्ग क्र. ४ बायपास रोडवरील वारजे, पुणे येथील सिंहगड उड्डाणपुलाचे काम करणे.

**पिंपरी चिंचवड महानगर पालिकाकडील चालु असलेली कामे**

१. महाराष्ट्र मेट्रो रेल कार्पोरेशन लिमिटेड मार्फत पिंपरी ते स्वारगेट भागात मेट्रो चे एकुण १६.५८९ कि.मी. चे काम करण्यात येत असुन त्यातील पहिला टप्पा कलासागर ते हॅरीस ब्रीज चे एकुण ६.३१२ कि.मी. चे काम चालु आहे. त्यामुळे जुना पुणे मुंबई हायवे, पिंपरी ते हॅरीस ब्रीज पर्यत वाहतुक कोंडी होत आहे.

२. नाशिकफाटा ते वाकड बी.आर.टी.एस.रोडवर साई चौक येथे ग्रेड सेपरेटर व पावसाळी पाईप लाईन टाकणे.

३. केशवनगर काळेवाडी रस्त्याचे कॉक्रिटीकरण करण्याचे काम करणे.

४. पिंपरी लिंक रोडवर हर्षदा आपार्टमेंट ते बौध्दगर पर्यंत ७५० मी.मी. व्यसाची गुरुत्व नलिका टाकणे.

५. मौजे वाकड येथील सिल्व्हर स्पुन हॉटेल ते एम.डी.आर ३१,हिंजवडी पर्यत गॅस पाईप लाईन टाकणे.

६. मौजे वाकड येथील कस्तुरी हॉटेल ते हिंजवडी बी.आर.टी.एस.रोड पर्यत गॅस पाईप लाईन टाकणे.

७. पिंपरी-चिंचवड भागामध्ये स्मार्ट ट्रॅफिक टाईम सिस्टम बसविणे.